R/9
1055

Recommendation of the Commission in the matter of CR-145/2015 is prepared and placed on flag "A" for Concurrence.

[signature]
30.7.2015

Chairman (Incharge)

[signature]
3/8/15

Issue order

[signature]
3/8

प/137
1063

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग समोर
बाल हक्क संरक्षण कायदा कलम 13(1) व 14 अंतर्गत चौकशी
प्रकरण क. 145 / 2015–16

श्री. सुरेंद्र सुदाम गागडे ..... अर्जदार

विरुध्द

सेंट जॉन बॉस्को हायस्कूल, बदलापूर, जिल्हा ठाणे ..... प्रतिवादी

पार्श्वभूमी

श्री. सुरेंद्र गागडे यांनी सेंट जॉन बॉस्को हायस्कूल, बदलापूर (प.) यांचेविरुध्द तकार दाखल केली आहे त्यात असे नमूद केले आहे की, त्यांची दोन मुले नववी व पाचवी इयत्तेत सदर शाळेत शिकत होती परंतू शाळेने 2013–14 या शैक्षणिक वर्षात नववीत शिकणाऱ्या त्यांच्या मोठा मुलगा कु.सोमेश याला हेतूपुरस्सर अनुत्तीर्ण करण्यात आले व त्यामुळे शाळेतून काढून टाकण्यात आले. हि कार्यवाही नियमबाहय आहे व वारंवार माझ्या मुलाला, तुला आम्ही पास करणार नाही अश्या धमक्या देत होते. त्यांचे म्हणणे असे आहे की, शाळेच्या नियमानुसार फी न दिल्यामुळे त्यांच्या मुलाला असा त्रास दिला जात होता. परंतू असे असताना दिनांक 29/5/2013 रोजी नववीचा निकाल लागल्यानंतर मुलाच्या आजोबांचा अंगठयाचा ठसा घेऊन शाळा सोडल्याचा दाखला दिला याबाबत दिनांक 12/6/2014 रोजी गट शिक्षण अधिकारी व शिक्षण अधिकारी यांचेकडे अर्जदाराने तकार केली. अर्जदाराने असेही नमूद केले आहे की त्यांचा मुलगा नववी पास न झाल्यामुळे त्याचे मानसिक खच्चीकरण झाले होते. म्हणून शाळेच्या विरोधात बाल हक्क संरक्षण कायद्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

2. आयोगाने या प्रकरणाची सुनावणी दिनांक 25/6/2015 रोजी ठेवण्यात आली व शाळेला तसेच शिक्षण अधिकारी यांना नोटीस देऊन सुनावणी वेळी हजर राहण्याबाबत निर्देश दिले. शाळेने शपथपत्र दिले त्यात त्यांनी अर्जदाराने उपस्थित केलेले मुद्दे खोटे व चुकीचे आहे असे नमूद करुन शाळेतील मुख्याध्यापक यांनी आपल्या शपथपत्राात असे नमूद केले आहे की अर्जदाराची दोन मुले याच शाळेमध्ये आहेत. शाळेने कु.सोमेश याला खाजगीरित्या फॉम 17 भरुन एस.एस.सी. परिक्षा

देणेबाबत निर्देश दिले कारण नववी मध्ये दोन वेळा उत्तीर्ण न झाल्याने दहावीची परिक्षा विद्यार्थी देवू शकत नाही. शिक्षण अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांनी दिनांक 24/6/2015 रोजी 15 दिवसांची मुदत देणेबाबत आयोगाला विनंती केली परंतू अजून त्यांचे कडून काही अहवाल आला नाही. अर्जदार यांनी मुख्याध्यापक यांनी दाखल केलेल्या शपथपत्रावर प्रतिउत्तर दिले आणि त्यांनी शाळेविरुध्द कार्यवाही करावी असे नमूद केले.

2. सदर तक्रारीत अर्जदाराचा मुलगा हा नववी इयत्तेत आहे म्हणून या प्रकरणात मोफत व सक्तीचा शिक्षण कायदा लागू होत नाही. मोफत व सक्तीचा शिक्षण कायदा आठवी इयत्ते पर्यंत लागू होतो त्याप्रमाणे मोफत व सक्तीच्या शिक्षण कायद्या अंतर्गत आयोगाला यावर काहि कार्यवाही करण्याचे अधिकार नाही. फक्त बाल हक्क संरक्षण कायदा खालिल जर मुलाच्या हक्काचा भंग झाला असेल तर आयोग कार्यवाही करु शकते या प्रकरणात बालकाच्या हक्काचा भंग झाला ही तपासणीची बाब आहे म्हणून सदर प्रकरणात आयोग खालील प्रमाणे शिफारस करीत आहे.

अ) शिक्षण अधिकारी यांना निर्देश देण्यात येते की या प्रकरणाची तपासणी करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करुन अहवाल आयोगाला सादर करण्यात यावा व सदर प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.

आयोगाचा शिक्का व हुकमावरुन

3/8/2015

(अ.ना.त्रिपाठी)
भा.व.से.
सचिव
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग

03 AUG 2015